# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,जळगाव

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त तथा नॅक प्रमाणित संस्था

राष्ट्रीय महामार्ग क्र.०६, जळगाव ४२५ ००२

दुरध्वनी क्र.०२५७-२२८१५२२ फॅक्स क्र.०२५७-२२८१३१९

Websit: www.gcoej.ac.in E-mail-princoej@rediffmail.com


जा.क्रशाअमज/वि.वि./२०१९/ 67 दिनांक- 5 JAN 2019

## महत्वाची सुचना

विषय- सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ घोषित केलेल्या मंडळातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरीताचे परीक्षाशुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ- १शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३८१/तांशि-४ दिनांक-२०/११/२०१८

२.संचालनालयाचे पत्र जा.क्र.२३अ/एडीएम/२०१८/१५६४ दिनांक-०६/१२/२०१८

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृष परिस्थिती घोषित केलेली आहे, त्यानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरीताचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत कळविलेले आहे. त्याअन्वये Trigger-2 लागू झालेल्या १८० तालुक्यातील जे विद्यार्थी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील विविध अभ्यासक्रमांकरीता चालू शैक्षणिक वर्षात प्रवेशित असतील,अशा विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, जे विद्यार्थी खालील अटी वशर्ती पुर्ण करीत असतील, अशा विद्यार्थ्यांनीच अर्जासह आवश्यक ती खालील कागदपत्रे जोडुन अर्ज दिनांक १७/०१/२०१९ पर्यंत कार्यालयात सादर करावेत.याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. (सुलभ संदर्भासाठी शासन निर्णय संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे)

अर्जासोबत आवश्यक कागदपत्र

१. नियमित अभ्यासक्रम व सत्र प्रवेश फि भरल्याची पावती व ओळखपत्र.

२. हॉल तिकीटाची छायांकीत प्रत व परीक्षाशुल्क भरल्याचा पुरावा

३. दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेला तालूक्यात रहिवासाचा पुरावा.

४.पालकांचे प्रत्यक्ष राहण्याचे ठिकाणाचा पुरावा (आधार कार्ड / मतदार ओळखपत्र).

५ पालकांचा सन २०१७-२०१८ वार्षिक उत्पन्नाचा दाखला

६. राजर्षीशाहुमहाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजने अंतर्गत अर्ज केलेला असल्यास अर्जाची प्रत.

७. परीक्षाशुल्क माफिची सवलत इतरशासकीय अधिकारी यांचे कडून प्राप्त न झाल्याबाबत विद्यार्थ्याचे हमीपत्र.

विद्यार्थ्याने विहीत वेळेत अचूक माहिती सादर करणे बंधनकारक असून चुकीची/ अपुर्ण माहिती असल्यास उपरोक्त परीक्षा शुल्क माफ केले जाणार नाही व अशा विद्यार्थ्यांवर दंडात्मक कार्यवाही केली जाईल,याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य,

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,जळगाव

प्रत- १. मुख्य सुचना फलक-कार्यालय,ग्रंथालय

२. सर्व विभागप्रमुख यांचे माहिती व पुढील कार्यवाहीस्तव

२/-त्यांना कळविण्यांत येते की, वरील सुचना विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी.

३.शैक्षणिक अधिष्ठाता यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

४. रोखपाल यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

५. श्री. आर. एल. वाणी यांना संस्थेच्या संकेतस्थळावर टाकण्याकरीता.